महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

सोमवार ❖ ०७ ऑक्टोबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १०४ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024



पाचवी माळ : श्री स्कंदमाता

# लेकराशी काय भिडता? बापाशी भिडा!

## एकनाथ शिंदे -उद्धव ठाकरें यांच्यात कलगीतुरा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**विशेष प्रतिनिधी**

विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे अनेक राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राज्यभरात सध्या ठिकठिकाणी सभा आणि मेळावे सुरु असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एकीकडे महायुती तर दुसरीकडे महाविकास आघाडी अशा राज्यभरात सभा सुरु आहेत.

त्याचबरोबर विविध मतदारसंघात निवडणुकीची रणनीती आखली जात आहे. पक्ष संघटनेचा आढावा नेत्यांकडून घेतला जात आहे. यातच काही पदाधिकारी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही दिसून येत आहे. या अनुषंगाने आज शिवसेना (शिंदे) युवासेनेचे नेते तथा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे माजी स्थायी सभापती दिपेश म्हात्रे यांनी त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत (ठाकरे) प्रवेश केला. त्यामुळे कल्याण-डोंबिवलीत शिवसेनेला (शिंदे) धक्का बसला.

**'मुलाशी काय भिडता? बापाशी भिडा',**

दरम्यान, दिपेश म्हात्रे यांच्या पक्ष प्रवेशावेळी उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला. मात्र, यावेळी उद्धव ठाकरे यांनी खासदार श्रीकांत शिंदेंचा कार्ट असा उल्लेख केला. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना प्रत्युत्तर दिलं. 'मुलाशी काय भिडता? बापाशी भिडा', असं आव्हान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंचं नाव न घेता दिलं.

### 'मुख्यमंत्र्यांचं कार्ट...' म्हणत उद्धव ठाकरेंचं श्रीकांत शिंदेंवर टीकास्त्र

महाविकास आघाडीच्या काळात आपले अडीच वर्ष सरकार होते. परंतु गद्दारांनी भाजपाच्या नादाला लागून गद्दारी केली आणि आपले सरकार पाडले. आता तिकडे गद्दार जाऊन बसलेत. पण तुम्हाला तिकडे वाईट अनुभव आल्यानंतर आणि तिकडे काय परिस्थिती आहे हे कळल्यावर तुम्ही स्वगृही परतलात. आता तुम्ही बाळासाहेबांच्या विचारांच्या मूळ शिवसेनेत आला आहात. आता जे तिकडे गद्दार जाऊन बसलेत, त्यांना मी परत घेणार नाही. जरी आले तरी उमेदवारी देणारच नाही. परंतु तुमच्यासारखे जे निष्ठावंत आहेत, त्यांना मात्र पक्षाचे दरवाजे उघडे असतील. गद्दारांना शिवसेनेत मुळीच थारा देणार नाही, असा घणाघात उद्धव ठाकरेंनी शिंदे गटातील नेत्यांवर केलाय. यावेळी तुम्ही कल्याण-डोंबिवली मतदारसंघातील आहात, थोडंसं आधी आला असता तर आपण या गद्दारांना लोकसभेतच गाडलं असतं. कल्याण-डोंबिवली लोकसभा मतदारसंघांमध्ये पैसा आणि सत्तेचा गैरवापर केला गेलाय. तिथे जे आता खासदार आहेत, 'मुख्यमंत्र्यांचं कार्ट... हे तिकडे सत्तेचा गैरवापर करताहेत. परंतु तुम्ही आता आल्यामुळं तुमची ताकद विधानसभा निवडणुकीत दाखवून द्या, ते दाखवालच..., अशी मला आशा असल्याचं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.



# १८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. तारा भवाळकर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

पुणे : सरहद, पुणे आयोजित 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' २०, २२ आणि २३ फेब्रुवारी २०२५ रोजी 'तालकटोरा स्टेडिअम, दिल्ली' येथे होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्याच्या आणि लोकसंस्कृतीच्या ज्येष्ठ अभ्यासक, लेखिका डॉ. तारा भवाळकर यांची एकमतानं निवड करण्यात आली. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी दिली. दिल्लीत होणार मराठी साहित्य संमेलन : पुण्यातील




महाराष्ट्र साहित्य संमेलन येथे रविवारी बैठक पार पडली. या बैठकीस अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे, कार्यवाह उज्ज्वला मेहेंदळे, कोषाध्यक्ष प्रकाश पागे, उपाध्यक्ष गुरय्या स्वामी, प्रा. मिलिंद जोशी, सुनिताराजे पवार, आदी उपस्थित होते. हे मराठी साहित्य संमेलन २०, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी तालकटोरा स्टेडिअम दिल्ली येथे होणार आहे. पहिल्या दिवशी ग्रंथदिंडी, ध्वजारोहण आणि ग्रंथ प्रदर्शनाचं उद्घाटन होणार आहे. तर संमेलनाचं उद्घाटन दुपारी चार वाजता होणार आहे. सायंकाळी निमंत्रितांचे कविसंमेलन होणार आहे.


**कोण आहेत डॉ. तारा भवाळकर?**

भवाळकर यांचा जन्म १ एप्रिल १९३९ मध्ये झाला. प्रामुख्याने त्या वैचारिक लेखन करणाऱ्या एक मराठी लेखिका आहेत. प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम केलं आहे. निवृत्त झाल्यावर पुण्यातील ललित कला अकॅडमी आणि मुंबई विद्यापीठ लोककला अकॅडमीमध्ये अतिथी प्राध्यापक देखील होत्या. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकपरंपरा आणि लोककला या विषयांचा गाढा अभ्यास आहे. लोकसंस्कृती, नाट्यसंशोधन, संतसाहित्य, एकांकिका, ललित लेखन, लोककला आणि स्त्री जाणिवांवर भाष्य करणारे लेखन त्यांनी केलं आहे.

# शहापूर तालुक्यात साकारणार नवा वीज निर्मिती प्रकल्प

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर** : ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील कळभोंडे गावानजीक लादेची वाडी येथे तर नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील जामुंडे गावात घाटघर प्रकल्पाच्या धर्तीवर १५०० मेगावॅटचा वीज निर्मिती प्रकल्प होणार आहे. या प्रकल्पासाठी प्रत्यक्षात जागेवरील झाडांची आणि वनखात्याच्या क्षेत्राची मोजणी झाली आहे. शिवाय अप्पर जिल्हाधिकारी मनीषा जायभाये यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण विषयक जनसुनावणी देखील घेण्यात आली. या प्रकल्पाचे प्रस्तावक म्हणुन जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी टू लि.कंपनी असून ईक्यूएमएस ग्लोबल प्रा.लि. कंपनीने प्रस्ताव सादर केला आहे. शहापूर तालुक्यातील चोंढे हद्दीतील घाटघर जलविद्युत प्रकल्पाच्या २५० मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्पानंतर आता इगतपुरीमधील जामुंडे तर




शहापुरातील कळभोंडे या भागात तब्बल १५०० मेगावॅटचा वीज निर्मिती प्रकल्प प्रस्तावित असून हा प्रकल्प उपलब्ध असलेल्या अक्षय ऊर्जेचा वाटा वाढविण्याच्या दृष्टीने ठरवलेला आहे. या प्रकल्पासाठी डॅम, जलाशय आणि इतर कामांसाठी २७८.९२ हेक्टर जमिनीची आवश्यकता असून यामध्ये खाजगी जमीन ३५.१८ हेक्टर व वनजमीन २४३.७४ हेक्टर आहे. सर्वेअंती या ठिकाणी झाडांच्या ८४ प्रजाती, झुडपांच्या ४१, वन औषधींच्या ४० तर गवताच्या १८ प्रजाती तर ४९ पक्ष्यांच्या प्रजातींचे निरीक्षण करुन नोंद करण्यात आली आहेत. दरम्यान या वीज प्रकल्पामुळे २४७.७४ हेक्टर जंगलाचे नुकसान होऊन येथील १० कुटूंबे विस्थापित होणार आहेत. यामुळे बांधकामादरम्यानच्या आवाजामुळे या क्षेत्रातील प्राण्यांना देखील त्रास होण्याची शक्यता आहे. सदर वीज प्रकल्प करण्यापूर्वी आमच्या ग्रामपंचायत हद्दीत पाणी, रस्ते तसेच स्थानिकांना रोजगार उपलब्ध व्हावा. तसेच अहवालानुसार १० कुटूंबे विस्थापित होणार असल्याचे दाखविले असले तरी एकूण २७ कुटूंबे विस्थापित होणार असून या सर्वच कुटुंबांना न्याय मिळायला हवा, असे कळभोंडे ग्रामपंचायत सदस्य शिवाजी विर यांनी सांगितले.





# पंतप्रधानांच्या ठाण्यातील कार्यक्रमावर शिवसेनेची छाप

● दै.ठाणे जीवनदीप वार्ता ●

**ठाणे :** विधानसभा निवडणुका तोंडावर असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुंबई महानगर प्रदेशात काही हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या संपूर्ण सोहळ्यावर आपली आणि आपल्या पक्षाची छाप कशी राहील याची पूर्ण आखणी केल्याचे यानिमित्ताने दिसून आले. मोदी यांच्या जाहीर कार्यक्रमासाठी ठाण्यातील मैदान निवडीपासून गर्दी जमविण्यापर्यंत आवश्यक असलेली संपूर्ण यंत्रणा शिंदे यांच्या शिवसेनेकडून उभी करण्यात आली.

ठाणे जिल्ह्यातील शहरी-ग्रामीण पट्ट्यातील शाखाप्रमुखांपासून प्रमुख नेत्यांपर्यंत प्रत्येकाला या कार्यक्रमासाठी विशिष्ट अशी जबाबदारी नेमून देण्यात आली होती. शिवसेनेचा एखादा मेळावा भासावा या पद्धतीने शिंदे गटाचे आमदार, नेते, पदाधिकारी गेले आठवडाभर सक्रिय दिसत असताना ठाण्यातील भाजपच्या प्रमुख नेत्यांना शनिवारी सकाळपर्यत या कार्यक्रमात आपली 'जागा' नेमकी कुठे असेल याचाही थांगपत्ता लागत नव्हता, असे चित्र होते.

विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लवकरच लागेल अशी चिन्हे दिसत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा शनिवारचा महाराष्ट्र दौरा महायुतीच्या राजकीय आखणीसाठी महत्त्वाचा ठरेल अशीच चिन्हे होती. मोदी यांच्या या दौऱ्याचा शेवटचा टप्पा हा महायुतीसाठी अतिशय महत्त्वाचा मानल्या जाणाऱ्या मुंबई, ठाण्याच्या दिशेने होता. त्यामुळे वेगवेगळ्या विभागांच्या माध्यमातून आखण्यात आलेल्या हजारो कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पायाभरणी पंतप्रधानांच्या हस्ते करण्याची आखणी करण्यात आली.

हा कार्यक्रम बालेकिल्ला असलेल्या ठाण्यातच करावा असा आग्रह मुख्यमंत्र्यांनी धरला आणि लाडकी बहीण योजनेच्या धनादेश वाटपाचे निमित्त साधत एक जंगी मेळावा घोडबंदर भागातील मोठ्या मैदानावर ठरविण्यात आला. गृहमंत्री अमित शहा यांच्या नवी मुंबई, मुंबईतील दौऱ्यानंतर पंतप्रधानांच्या महाराष्ट्रातील कार्यक्रमाच्या आखणीने जोर धरला आणि गेले आठवडाभर शिंदे यांच्या पक्षाची संपूर्ण यंत्रणा ठाण्यात राबताना दिसली.

भाजप नेते नावापुरतेष्ठ. सूत्रधार शिंदे गटच

घोडबंदर भागातील वालावलकर यांच्या मूळ मालकीची असलेली जागा या कार्यक्रमासाठी निवडणे, तेथील टेकड्यांचे उतार सपाट करणे, दलदलीच्या जागा भरणे, याठिकाणी भव्य वाहनतळांची व्यवस्था करणे अशी संपूर्ण आखणी मुख्यमंत्र्यांच्या निकटवर्तीयांकडून करण्यात येत होती. या जागेच्या सपाटीकरणासाठी रायगड तसेच आसपासच्या भागातील दगडखाणींमधून खडी, माती आणण्याची व्यवस्था शासकीय यंत्रणांमार्फत शिंदे गटाचे पदाधिकारी करताना दिसत होते. ठाणे, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली महापालिकेतील संपूर्ण शासकीय यंत्रणा कामाला लावताना येथील प्रमुख अभियंते, अधिकाऱ्यांशी संपर्काची जबाबदारीही शिंदे यांच्या पक्षातील नेते, पदाधिकारी पाहात होते. सभास्थळांच्या नियोजनात भाजपच्या पदाधिकाऱ्यांना फारसा वाव राहणार नाही अशी 'व्यवस्था' मुख्यमंत्र्यांच्या पक्षाकडून पद्धतशीरपणे करण्यात आली होती. या कार्यक्रमात आपण नेमके कुठे बसायचे याचा थांगपत्ताही भाजपच्या काही प्रमुख नेत्यांना सकाळपर्यंत लागत नव्हता अशी परिस्थिती होती. पक्षाच्या एका आमदाराने यासंबंधीची नाराजी आयोजकांकडे बोलून दाखविल्याचे समजते. पंतप्रधानांच्या स्वागतासाठी ठरविण्यात आलेल्या चमूमध्ये भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना मात्र स्थान देण्यात आले होते.



**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार ठाण्यातील पक्षाची संपूर्ण यंत्रणा या कार्यक्रमाच्या आयोजनात अग्रभागी दिसत असली तरी महायुतीचे सर्व नेते, कार्यकर्त्यांचा सहभागही महत्त्वाचा होता. ठाणे आणि शिवसेना हे समीकरण नेहमीच वैशिष्ट्यपूर्ण राहिले आहे. त्यामुळे ठाण्यात पंतप्रधानांच्या उपस्थित होणारा सोहळा यशस्वी करण्यासाठी शिवसैनिक उत्साहाने अग्रभागी राहणे स्वाभाविक होते.**
**- नरेश म्हस्के, खासदार, शिवसेना (शिंदे)**

**आजचा कार्यक्रम काही राजकीय नसला तरी महायुतीतील सर्व घटक पक्षाने एकत्रितपणे हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले. या कार्यक्रमाच्या आयोजनात शासकीय यंत्रणा अग्रभागी होत्या. पंतप्रधानांच्या स्वागतासाठी आणि कार्यक्रम स्थळी देखील भाजपा नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना योग्य स्थान होते. - संजय केळकर**
**आमदार भाजप**



# ठाकुर्ली चोळेत दीपेश म्हात्रे यांचे बॅनर लावण्यास बंदी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**डोंबिवली -** डोंबिवली जवळील ठाकुर्ली, चोळेगाव हद्दीत शिवसेनेचे युवा प्रदेश सचिव दीपेश पुंडलिक म्हात्रे यांचे राजकीय किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे जाहिरात फलक रस्त्यांवर लावण्यास सक्त मनाई करण्याचा निर्णय चोळेगाव ग्रामस्थांनी घेतला आहे. शनिवारपासून अशा सक्त मनाईचे आदेश ठाकुर्ली, चोळेगाव हद्दीत मुख्य रस्ते, चौकांमध्ये झळकत आहेत.

शिवसेनेचे युवा सेनेचे प्रदेश सचिव, माजी स्थायी समिती सभापती दीपेश म्हात्रे शिवसेने शिंदे गटातून उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करणार असल्याच्या जोरदार चर्चा गेल्या काही दिवसांपासून शहरात सुरू आहेत. या विषयांवरून दीपेश म्हात्रे यांचे नवरात्रोत्सव किंवा राजकीय फलक डोंबिवली शहराच्या विविध भागात लावण्यात येत आहेत. अशाच प्रकारचे फलक ठाकुर्ली, चोळेगाव, ९० फुटी रस्ता भागात लावण्याचा प्रकार घडला.

दीपेश यांचे वडील माजी महापौर पुंडलिक म्हात्रे आणि चोळेगाव, खंबाळपाडा येथील काही ग्रामस्थांमध्ये जुना वाद आहे. या पूर्ववैमनस्य वादातून दिपेश म्हात्रे यांचे फलक चोळेगाव, खंबाळपाडा, ठाकुर्ली परिसरात न लावण्याचा निर्णय चोळेगाव परिसरातील ग्रामस्थांनी घेतला गेला असण्याची चर्चा ठाकुर्ली परिसरात आहे. या फलकबाजीमुळे चाळीस वर्षापूर्वीचा पूर्ववैमनस्यातील वाद पुन्हा चर्चेत आला असल्याची चर्चा शहरात आहे. डोंबिवलीत सार्वजनिक नवरात्रोत्सव विविध मंडळांकडून साजरा केला जात आहे. यामधील बहुतांशी मंडळांना सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचा आशीर्वाद आहे. या मंडळांच्या मंडपांबाहेर दीपेश म्हात्रे यांचे नवरात्रोत्सव मंडळांना शुभेच्छा देणारे फलक म्हात्रे यांच्या कार्यकर्त्यांनी लावले होते. पण यावरून राजकीय वाद उद्भवण्याची शक्यता विचारात घेऊन बहुतांशी नवरात्रोत्सव मंडळांनी दीपेश म्हात्रे यांचे मंडपांवरील फलक स्वताहून काढून टाकल्याची माहिती नवरात्रोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी दिली.




# गेटवे ते डोंबिवली अल्ट्रा अर्बन मॅरेथॉनच्या पाचव्या पर्वाचे उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**कल्याण :** रनर्स क्लन फाउंडेशन डोंबिवली यांच्यावतीने गेटवे ऑफ इंडिया ते डोंबिवली अर्बन अल्ट्रा 'एक दौड वीर जवानों के लिए' ६५ किलोमीटर दौडचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते धुमधडाक्यात उद्घाटन झाले. ही मॅरेथॉन फक्त एक शारीरिक स्पर्धा नाही तर त्यामागे एक सखोल भावना आहे देश सेवेसाठी समर्पण, शौर्य आणि त्यागाची. आपण आपल्या सैनिकांच्या साहसाला आणि त्यांच्या समर्पणाला सलाम करत आहोत. ज्यांच्या अथक प्रयत्नामुळे आपण सुरक्षित आणि स्वातंत्र्य आहोत.

या मॅरेथॉनचे हे पाचवे पर्व आहे. २ फेब्रुवारी २०२५ रोजी ही मॅरेथॉन होणार आहे. आज टी-शर्ट चे अनावरण करण्यात आले आणि वेगवेगळ्या रनर्स ग्रुपना ऑनलाइन रजिस्ट्रेशन खुले करण्यात आले. तसेच डोंबिवली मधील वेगवेगळ्या अकॅडमींना पोलीस भरती, आर्मी भरती अभ्यासासाठी लागणारी पुस्तके देण्यात आली.

सदर कार्यक्रमाच्या उदघाटन सोहळ्याला महाराष्ट्र राज्याचे बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, गजानन माने, बिजय नायर निवृत्त लेफ्टनंट कमांडर भारतीय नौसेना, माधव सिंग ग्लोब बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, निखिल दुधे पॅसिफिक बिल्डर ग्रुप बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, देसाई जीएसटी कमिशनर या मान्यवरांची उपस्थिती लाभली. या सर्वानी आपली मनोगते व्यक्त केली व उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे रनर्स क्लन फौंडेशन चे विश्वस्त लक्ष्मण गुंडप यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करत जास्तीत जास्त लोकांनी या दौड मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार नितीन कुवर यांनी मांडले.



# शर्यतीतील घोड्यांची सुटका

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई -** मुंबई अहमदाबाद महामार्गाजवळील वरसावे येथे घोडागाडी शर्यत आयोजित करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी प्राण्यांसाठी काम करणाऱ्या पेटा संस्थेने दिलेल्या तक्रारीनुसार काशिगाव पोलिसांनी कारवाई करून ६ घोड्यांची सुटका केली आणि ३ जणांना अटक करण्यात आली आहे. वरसावे पुलावर मध्यरात्री घोडागाडी शर्यत होणार असल्याची माहिती पेटा (पिपल फॉर द एथिकल ट्रिटमेंट ऑफ ?निमल) या प्राण्यांसाठी काम करणाऱ्या संस्थेने मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तांना दिली होती. त्यानुसार मध्यरात्री काशिगाव पोलिसांनी या वरसावे नाका परिसरात गस्त घातली होती. रात्री साडेबाराच्या सुमारास काही तरुणांचा गट घोडागाडी शर्यत करत असल्याचे आढळून आले. पोलिसांच्या पथकाने त्यांना अडवून ताब्यात घेतले आणि घोड्यांची सुटका केली.



# दुर्गाडी किल्ला नवरात्रौत्सवामुळे कल्याणमधील वाहतूक कोंडीत भर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** येथील दुर्गाडी किल्ल्यावर दुर्गाडी देवीचा नवरात्रोत्सव आणि किल्ल्याच्या पायथ्याशी शुक्रवारपासून जत्रोत्सव सुरू झाला आहे. या जत्रोत्सवामुळे गोविंदवाडी बाह्यवळण रस्ता पुढील शनिवारच्या दसऱ्यापर्यंत दररोज संध्याकाळी पाच ते रात्री १२ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी वाहतूक विभागाकडून बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत भिवंडी कोन, शिळफाटा पत्रीपूल भागातून येणारी सर्व वाहने कल्याण शहरातील लालचौकी, शिवाजी चौकमार्गे पत्रीपूल दिशेने इच्छित स्थळी जातील, असे कल्याण वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश शिरसाठ यांनी सांगितले.

कल्याण शहराबाहेरून गोविंदवाडी वळण रस्त्याने धावणारी सर्व जड, अवजड, लहान वाहने एकाचवेळी शिवाजी चौकमार्गे इच्छित स्थळी जाण्यास गुरूवारपासून सुरूवात झाली आहे. त्यामुळे गुरूवारपासून कल्याण शहरातील पत्रीपूल ते शिवाजी चौक, लालचौकी या मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्ते वाहन कोंडीत अडकून लागले आहेत. पालिका मुख्यालयातून सहजानंद चौकापर्यंत जाण्यासाठी प्रवाशांना एक तास लागत आहे. नोकरदार वर्ग, मालवाहू वाहनांचा या कोंडीचा सर्वाधिक फटका बसू लागला आहे.

**दुर्गाडी येथील जत्रोत्सवामुळे गोविंदवाडी वळण रस्ता संध्याकाळी पाच ते रात्री १२ वाजेपर्यंत दसऱ्यापर्यंत वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. या कालावधीत गोविंदवाडी वळण रस्त्याने धावणारी वाहने शिवाजी चौकमार्गे जाणार आहेत. कल्याण शहरातील वाहन संख्या वाढून वाहन कोंडी होत आहे. नागरिकांनी खासगी वाहनांचा वापर टाळून जत्रेच्या ठिकाणी रिक्षा, ओलासारख्या वाहनांनी यावे.**
**- राजेश शिरसाठ वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहतूक विभाग, कल्याण.**

पत्रीपूल ते शिवाजी चौक, लालचौकी या सर्वाधिक वर्दळीच्या रस्त्याला लालचौकी, सहजानंद चौक, डॉ. तेलवणे रुग्णालय, शिवाजी चौक, गुरुदेव हॉटेल भागात अंतर्गत पोहच रस्ते आहेत. काही रस्ते कल्याण रेल्वे स्थानक भागात जातात. मुख्य वर्दळीच्या रस्त्यावरील वाहनांना पुढे सरकण्यास जागा नसल्याने अंतर्गत पोहच रस्त्यावरील वाहने जागीच खोळंबून राहत आहेत. पत्रीपूल ते लालचौकी या आठ मिनिटाच्या प्रवासाला एक ते दीड तास लागत असल्याच्या तक्रारी प्रवाशांनी केल्या. कोंडी सोडविताना वाहतूक पोलिसांची दमछाक होत आहे.

दरवर्षी नवरात्रोत्सवाच्या १० दिवसाच्या काळात दुर्गाडी किल्ला येथील जत्रोत्सवामुळे वाहने कल्याण शहरात अडकून पडतात. त्यामुळे दुर्गाडी किल्ला येथील जत्रोत्सव किल्ल्याच्या एका बाजुला, जुन्या दुर्गाडी पुलाच्या दिशेने भरण्याची नागरिकांची मागणी आहे. या महत्वपूर्ण विषयाकडे कोणीही लक्ष देत नसल्याने प्रवाशांना दरवर्षी वाहन कोंडीला सामोरे जावे लागते.

संध्याकाळी पाच वाजल्यानंतर शिळफाटा, भिवंडी, नाशिक भागातील मालवाहू अवजड वाहने कल्याण शहरातून पत्रीपूल दिशेने नवी मुंबई, पनवेल भागात जाण्यासाठी प्रवेश करतात त्यामुळे वाहन कोंडीत आणखी भर पडते. रात्री दहा वाजल्यानंतर तळोजा, उरण भागातून अवजड मालवाहू वाहनांची संख्या वाढली की कल्याण शहर रात्री उशिरापर्यंत वाहन कोंडीत अडकते. या कोंडीला कंटाळून बहुतांशी प्रवाशांनी रिक्षा, ओला उबर वाहनाने प्रवास करण्याचा निर्णय घेतला आहे.



## पाचवी माळ : श्री स्कंदमाता

शारदीय नवरात्रीच्या पाचव्या दिवसाची प्रमुख देवी स्कंदमाता आहे. स्कंदमाता भक्तांना सुख-शांती प्रदान करणारी देवी आहे. देवासुर संग्रामाचे सेनापती भगवान स्कंदची आई असल्यामुळे देवी दुर्गाच्या पाचव्या स्वरूपाला स्कंदमाता नावाने ओळखले जाते.

पूजन विधी - सर्वात पहिले चौरंगावर किंवा पाटावर स्कंदमाता देवीची मूर्ती किंवा प्रतिमा स्थापन करावी. चौरंगावर चांदी, तांबे किंवा मातीचा कलश स्थापन करून त्यामध्ये पाणी भरून त्यावर नारळ ठेवा. त्यानंतर चौरंगावर श्रीगणेश, वरुण, नवग्रह, षोडश मातृका (१६ देवी) ची स्थापना करावी. त्यानंतर व्रत, पूजांचा संकल्प घ्यावा.

वैदिक आणि सप्तशती मंत्राचा उच्चार करून स्कंदमातासहित सर्व स्थापित देवतांची षोडशोपचार पूजा करावी. यामध्ये आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, सौभाग्य सूत्र, चंदन, रांगोळी, हळद, शेंदूर, दुर्वा, बिल्वपत्र, दागिने, फुलं-हार, सुगंधित द्रव्य, धूप-दीप, नैवेद्य, फळ, पान, दक्षिणा, आरती, प्रदक्षिणा, मंत्र पुष्पांजलि इ. गोष्टी कराव्यात.

# चेंबूरमध्ये चाळीतील घराला भीषण आग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी

चेंबूरमध्ये चाळीतील एका घराला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत होरपळून पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. यामध्ये दोन चिमुकल्यांचादेखील समावेश आहे. प्राथमिक माहितीनुसार शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांसह अग्निशमन दलाने घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न केले. मुंबई महापालिकेने दिलेल्या माहितीनुसार, सिद्धार्थ नगर परिसरात चाळीतील एका घराला आज पहाटे साडेपाचच्या सुमारास आग लागली. घराच्या मीटर बॉक्समध्ये शॉकसर्किटमुळे ही आग लागल्याचे सांगितलं जात आहे. या घरात गुप्ता कुटुंबिय राहत असल्याची माहिती आहे. ते पहाटे झोपेत असताच ही घटना घडली. या आगीत गुप्ता कुटुबांतील पाच जणांचा मृत्यू झाला. यामध्ये दोन चिमुकल्यांचाही समावेश आहे. प्रेम गुप्ता (३०), अनिता गुप्ता (३०), मंजू गुप्ता (३०), परीस गुप्त (७) आणि नरेंद्र गुप्ता (१०) अशी मृत्यू झालेल्यांची नावे आहेत.

# जरंडी येथे डिजिटल अंगणवाडीचे उद्घाटन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

आज रविवार दि. ६ ऑक्टोबर रोजी ग्रुप ग्रामपंचायत धामणी मौजे (जरंडी ) आणि Association of Social Beyond Boundaries & Team यांच्या संयुक्त विद्यमाने जरंडी येथे डिजिटल अंगणवाडीचे उदघाटन माननीय श्री भगवान महादेव सांबरे व ASBB संस्था मुंबई यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाला जिजाऊ संघटना शहापूर तालुका अध्यक्ष श्री हरेशजी पष्टे, OBC प्रदेशाध्यक्ष श्री प्रकाश भांगरथ सर, OBC तालुका अध्यक्ष श्री अनिलजी निचिते, जिजाऊ संघटना प्रमुख श्री सुदर्शन पाटील, खर्डी कुणबी विभाग अध्यक्ष श्री प्रकाशजी सांडे, श्री वसंत मोरे साहेब, श्री बिपीनजी रस्तोगी, श्री विरेंद्रजी जैन, पत्रकार श्री नरेशजी जाधव, पत्रकार श्री दिनेश पाचघरे पत्रकार श्री हुसैन शेख, श्री पांडुरंग मोकाशी, ASBB संस्थेचे सागरजी जैन, राजजी खिमावत, प्रीत लाखीया, संकीत मेहता आणि टीम व ग्रुप ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच व सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
कौशल्य विकास केंद्र, गोवेली, म्हसा व खर्डी
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु ! प्रवेश सुरु ! प्रवेश सुरु !
१) बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं. ३०४२०२) कालावधी १ वर्ष
२) पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं. २०१२३०) कालावधी १ वर्ष
३) जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट(GNMA) (कोड नं. २०१२३७) कालावधी १ वर्ष
४) डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं. २०१४०४) कालावधी २ वर्ष
५) सिक्युरिटी अँण्ड फायर प्रिव्हिंजन प्रशिक्षण (कोड नं. ४११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
CALL: 8108559566 / 9158518832 / 9619188558
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे




सोमवार
०७ ऑक्टोबर २०२४

**मेष**
तुम्हाला राज्यकारभार आणि सत्तेचे पूर्ण लाभही मिळतील आणि तुमचा सन्मान वाढल्याने तुम्ही आनंदी व्हाल. तुमच्या जवळच्या व्यक्तीवर विश्वास ठेवल्याने समस्या निर्माण होऊ शकतात.

**वृषभ**
मानसिक शांती मिळेल आणि तणावमुक्त कामही होईल. आज तुमचा दिवस लाभदायक असेल. तुम्ही तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न

**मिथुन**
कोणताही निर्णय घेणे तुमच्यासाठी थोडे कठीण जाईल. काही कामात अपेक्षेपेक्षा जास्त आर्थिक लाभ होईल. आज तुमचा दिवस आत्मविश्वासाने भरलेला असेल. दुपारी प्रसन्न वाटेल.

**कर्क**
जर तुम्ही विचारपूर्वक पुढे गेलात तर सर्व काही ठीक होईल. दिवस तुमच्यासाठी खूप छान असेल. तुम्ही एखाद्या नातेवाईकाला भेटायला जाणार. राजकारणाशी संबंधित लोकांना यश

**सिंह**
कराल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षकांचे सहकार्य मिळेल. आगामी काळात तुमच्या महत्त्वाकांक्षा वाढतील आणि त्या पूर्ण करण्यासाठी तुम्ही

**कन्या**
धार्मिक कार्यात तुम्ही श्रद्धेने आणि विश्वासाने पुढे जाल तर आज तुमच्या कामात उतावळेपणा टाळलात तर भविष्यातील समस्यांपासून तुमचे रक्षण होईल. संमिश्र दिवस असेल.

**तुळ**
सामाजिक कार्यक्रमात जाण्याची संधी मिळेल. स्पर्धेची तयारी करणारे विद्यार्थी आपली तयारी सुरू ठेवतील दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. मुले आज तुम्हाला चांगली बातमी देतील

**वृश्चिक**
कठोर परिश्रम कराल.राजकारणाशी संबंधित लोकांना आज काही नवीन जबाबदाऱ्या मिळतील. आज तुम्ही धार्मिक कार्यात रस घ्याल.

**धनु**
अनेक कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील, ज्या तुम्ही चांगल्या प्रकारे हाताळाल. तुमच्यासोबत काम करणाऱ्या लोकांकडून तुम्हाला मदत मिळेल. व्यक्तिमत्त्वाला उंचावणारा दिवस

**मकर**
कुटुंबातील सर्व सदस्य आनंदी होतील. आरोग्याच्या बाबतीत तुम्हाला निरोगी वाटेल आणि घरातील मोठ्यांची सेवाही कराल. आज तुम्हाला तुमच्या मेहनतीचे फळ नक्कीच मिळेल.

**कुंभ**
दिवस कुटुंबासाठी नवीन आनंद घेऊन आला आहे.कुटुंबातील सदस्यांसोबत जास्त वेळ घालवाल आणि भविष्यातील योजनांवरही आल्हाद चर्चा कराल.

**मीन**
दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. कामाच्या बाबतीत आळशीपणामुळे दिवस तुमच्यासाठी कमकुवत असेल. तुमच्या कामाची गती मंद असेल, परंतु मित्रांसोबत तुमचे संबंध चांगले राहतील.

## कल्याण पश्चिमेतील महत्त्वाच्या रस्त्यांसाठी आणखी ५० कोटींचा निधी



❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**कल्याण** : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कल्याण पश्चिमेतील प्रमुख रस्त्यांच्या सिमेंट काँक्रीटीकरणासाठी आणखी ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. आमदार विश्वनाथ भोईर यांनी या निधीसाठी पाठपुरावा केला असून त्यामुळे आता पावसाळ्यात उद्भवणाऱ्या खड्ड्यांच्या समस्येतून कल्याणकरांची सुटका होणार आहे. या निधीच्या पहिल्या टप्प्यातील सिमेंट काँक्रीटीकरण कामाच्या भूमिपूजनाला प्रारंभ झाला आहे.

दरवर्षी पावसाळ्यात आणि त्यानंतरचे काही महिने म्हणजे नागरिकांसाठी तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी अवस्था असते. आधी रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांचा त्रास आणि त्यानंतर त्यातून उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. नागरिकांचा हा त्रास विचारात घेऊनच कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांसाठी निधीची वेळोवेळी मागणी केली. आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही कल्याण पश्चिमेतील प्रमुख रस्त्यांच्या सिमेंट काँक्रीटीकरणासाठी भरीव असा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून काही दिवसांपूर्वी कल्याण पश्चिमेतील रस्त्यांसाठी आणखी ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असल्याची माहिती आमदार विश्वनाथ भोईर यांनी दिली.

तसेच पहिल्या टप्प्यामध्ये भगवा तलाव येथील आदेश्वर चौक ते विकास हाईटस् (४.९५ कोटी), सर्वोदय सागर ते गोविंदवाडी बायपास मुख्य रस्ता (४.९० कोटी) आणि उंबर्डे येथील जुन्या मराठी शाळेपर्यंतचा रस्ता (४.५० कोटी) अशा १४ कोटी ३५ लाखांच्या निधीतील सिमेंट काँक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले. तर उर्वरित निधीतून कल्याण शहरातील इतर प्रमुख रस्त्यांचेही येत्या काही दिवसांत भूमिपूजन केले जाणार असल्याची माहिती आमदार भोईर यांनी दिली. येत्या काळात आपल्या भागांत चांगला रस्ता मिळणार असल्याबद्दल या भागांतील नागरिकांनी आमदार विश्वनाथ भोईर यांचे मनापासुन आभार मानले आहेत.

यावेळी झालेल्या भूमीपूजन सोहळ्याला आमदार विश्वनाथ भोईर यांच्यासह शिवसेना उपनेत्या विजया पोटे, शहरप्रमुख रवी पाटील, महिला जिल्हा संघटक छाया वाघमारे, विधानसभा संघटक श्रेयस समेळ, शहर संघटक नेत्रा उगले, माजी परिवहन समिती सदस्य सुनिल खारुक, विभागप्रमुख रामदास कारभारी, युवासेना राज्य सहसचिव प्रतीक पेणकर, लोकसभा विस्तारक सुचेत डामरे, शहर अधिकारी सुजित रोकडे यांच्यासह अनेक स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केडीएमसीच्या वर्धापन दिना निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण



❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण क्रीडा विभागामार्फत महापालिका वर्धापन दिनाचे औचित्य साधुन महापालिका वर्धापन दिन सोहळा आचार्य अत्रे रंगमंदिर येथे मोठया उत्साहात साजरा झाला.

वर्धापन दिन कार्यक्रमाचे उद्घाटन महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्याहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी महापालिका अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत नृत्याचा व गायनाचा कार्यक्रम मोठया उत्साहात संपन्न झाला. त्याचप्रमाणे उपआयुक्त संजय जाधव यांनी महापालिका अधिकाऱ्यांसोबत चालती बोलती प्रश्न मंजूषेत अधिकाऱ्यांना प्रश्न विचारुन उपस्थितांचे मनोरंजन केले. तसेच भारतीय पारंपारिक वेशभूषा केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, शहर अभियंता अनिता परदेशी, सहा. संचालक नगररचना दिक्षा सावंत, उपआयुक्त(साप्र) वंदना गुळवे, स्वाती देशपांडे, अतुल पाटील, रमेश मिसाळ, विजयकुमार द्वासे, माजी पालिका सदस्य रमेश जाधव या समयी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महेश देशपांडे आणि माणिक शिंदे यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नोडल अधिकारी तथा सहा. आयुक्त स्नेहा करपे यांनी केले. वर्धापन दिनाच्या कार्यकमावेळी महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी मोठया प्रमाणात उपस्थिती दर्शविली.

## मुंबईला २४ तास पाणीपुरवठा अशक्य

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**मुंबई** : शहराला २४ तास पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याचा पुनरुच्चार महापालिका प्रशासनाने केला आहे. २४ तास पाणीपुरवठा करण्याइतकी पाण्याची उपलब्धता नसून मुंबईची भौगोलिक स्थिती आणि रचनेमुळे २४ तास पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याचे प्रशासनाने मान्य केले आहे. त्यामुळे २४ तास पाणीपुरवठ्याचा प्रयोग पूर्णतः गुंडाळण्यात आला आहे.

मुंबई महापालिकेची निवडणूक जवळ आल्यानंतर मुंबईला २४ तास पाणीपुरवठा करण्याचे वचन राजकीय पक्षांकडून दिले जाते. मात्र २४ तास पाणी देणे शक्य नाही, असे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. २०१४ मध्ये २४ तास पाणीपुरवठा करण्याची घोषणा करण्यात आली होती. पाणीपुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी पालिकेने हाती घेतलेल्या मुंबई जलवितरण सुधारणा कार्यक्रमांतर्गत वांद्रे व मुलुंड परिसरात २४ तास पाणीपुरवठ्याचा प्रयोगही करण्यात आला होता. त्यावेळी या भागात पाण्याचे तास वाढवण्यात आले होते, पण २४ तास पाणीपुरवठा करता आला नाही. तेवढी पाण्याची उपलब्धता नाही, त्यामुळे ते शक्य नाही, अशी माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी अभ्यास दौऱ्यादरम्यान दिली.

# शहाड रेल्वे उड्डाणपुलाचे लवकरच विस्तारीकरण

### एमएमआरडीएकडून निविदा जाहीर ❍ चारपदरी उड्डाणपूल होणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी



**उल्हासनगरः** उल्हासनगर आणि कल्याण शहरांना जोडणारा तसेच कल्याण अहिल्यानगर या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या शहाड रेल्वे उड्डाणपुलाचे लवकरच विस्तारीकरण केले जाणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून यासाठीची निविदा जाहीर करण्यात आली आहे. सध्या दोन पदरी असलेला हा उड्डाणपूल दररोज कोंडीत सापडतो आहे. त्यामुळे या उड्डाणपुलाला चार पदरी केले जाणार आहे. येथील कोंडी फोडण्यासाठी उड्डाणपुलाचे विस्तारीकरण महत्वाचे ठरणार आहे.

गेल्या काही वर्षात कल्याण अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या शहाड उड्डाणपुलावरील कोंडी वाढली आहे. सातत्याने उड्डाणपुलाला खड्डे पडत असून त्यामुळे उड्डाणपुलावरील वाहतूक कोंडी वाढते. दोन पदरी असलेल्या या उड्डाणपुलाला काही दिवसांपूर्वी थेट भगदाड पडले होते. त्यामुळे येथून वाहतुकीचा वेग मंदावतो. त्याचा फटका येथील स्थानिक नागरिक, नगर जिल्ह्यातून येणारे भाजी आणि दूध विक्रेते यांच्या वाहनांना बसतो. या मार्गावर असलेल्या अनेक शाळांमधल्या विद्यार्थ्यांनाही या उड्डाणपुलाच्या वाहतूक कोंडीचा फटका बसतो आहे.

त्यामुळे वाहनचालकांमध्ये संतापाचे वातावरण होते. या उड्डाणपुलाच्या विस्तारीकरणाची मागणी एमएमआरडीएच्या बैठकीत स्थानिक खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केली होती. त्यानुसार एमएमआरडीएने आता या उड्डाणपुलाच्या विस्तारीकरणासाठी निविदा जाहीर केली आहे. लवकरच या उड्डाणपुलाच्या कामाला सुरूवात होणार आहे. त्यामुळे या भागातील वाहतुकीचा चेहरामोहरा बदलणार आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार शहाड स्टेशन येथील रेल्वेउड्डाणपुलाच्या कल्याण बाजूच्या रस्त्याची रुंदी ३० मीटर आहे. तर उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील रुंदी ३६ मीटर आहे. या उड्डाणपुलावरची वाहतूक गेल्या काही वर्षांत वाढली आहे. उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूला चार पदरी रस्ता तयार करण्यात आला आहे. मात्र उड्डाणपूल फक्त दुपदरी असल्याने अनेकदा उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंच्या प्रवेशद्वारावर कोंडी होत असते. विस्तारीकरणानंतर आता शहाड उड्डाणपुल २२ असा चार पदरी होईल.

## मुंबई उच्च न्यायालयाकडून विकी गणात्रा यांचा जामीन मंजूर

### गणपत गायकवाड गोळीबार प्रकरण

● दै.ठाणे जीवनदीप वार्ता ●



कल्याण - कल्याण पूर्वेतील भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांनी शिंदे गटाचे शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यावर उल्हासनगरमधील हिललाईन पोलीस ठाण्यात गेल्या फेब्रुवारीमध्ये गोळीबार करून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. या गोळीबार प्रकरणात आमदार गायकवाड यांचे व्यावसायिक भागीदार दिव्येश उर्फ विकी गणात्रा यांना पोलिसांनी अटक केली होती. आठ महिन्यांनंतर मुंबई उच्च न्यायालयाने सबळ पुराव्यांच्या आधारे विकी गणात्रा यांचा जामीन मंजूर केला.

विकी गणात्रा हे विकासक आणि व्यावसायिक आहेत. त्यांचे मोबाईल विक्रीचे दुकान कल्याणमध्ये आहे. गणात्रा हे आमदार गणपत गायकवाड यांचे बांधकाम व्यवसायातील भागीदार आहेत. गेल्या फेब्रुवारीमध्ये कल्याण पूर्वेत आमदार गायकवाड आणि शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यात द्वारली भागातील एका जमिनीवरून वाद सुरू होता. त्यावेळी हा वाद समझोत्याने मिटविण्यासाठी आमदार गणपत गायकवाड आणि त्यांचे समर्थक, शिंदे गटाचे शहरप्रमुख महेश गायकवाड आणि त्याचे समर्थक हिललाईन पोलीस ठाण्यात समझोत्याच्या बैठकीसाठी एकत्र आले होते. यावेळी पोलीस ठाण्याबाहेर दोन्ही गटात जोरदार बाचाबाची, धक्काबुक्की झाली होती.

पोलीस ठाण्याबाहेर हा प्रकार सुरू असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षकाच्या दालनात आमदार गायकवाड, व्यावसायिक विकी गणात्रा, शहरप्रमुख महेश गायकवाड, समर्थक राहुल पाटील बसले होते. बाहेर गदारोळ सुरू असताना महेश गायकवाड यांना काही कळण्याच्या आत आमदार गायकवाड यांनी जवळील रिव्हॉल्व्हरमधून सहा गोळया महेश यांच्या दिशेने झाडून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. या गोळीबारातून सुटका करण्यासाठी राहुल पाटील दालनाच्या बाहेर पळत असताना त्यांनाही गोळी लागल्याने ते जखमी झाले होते.

या गंभीर प्रकरणात पोलिसांनी आमदार गणपत गायकवाड यांच्यासह त्यांचा साथीदार विकी गणात्रा आणि इतर तीन जणांना अटक केली होती. आमदार गणपत यांचा मुलगा वैभव यांचेही नाव दाखल गुन्ह्यात आहे. पण तो फरार आहे. गेल्या आठ महिन्यांच्या कालावधीत विकी गणात्रा यांच्याकडून जामीन मिळण्यासाठी न्यायालयात प्रयत्न सुरू होते. कल्याण न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज यापूर्वीच फेटाळल्याने ते वकिलामार्फत उच्च न्यायालयात जामिनासाठी प्रयत्नशील होते. गोळीबारात गणात्रा यांचा कोणताही सहभाग नाही. गोळीबार होण्यापूर्वी गणात्रा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या दालनातून बाहेर पडले होते, हा संदर्भ गणात्रा यांच्यावतीने न्यायालयाला देण्यात आला. हा पुरावा ग्राह्य धरत न्यायलयाने विकी गणात्रा यांना जामीन मंजूर केला. या प्रकरणातील मुख्य आरोपी आमदार गणपत गायकवाड हे तळोजा येथील तुरुंगात आहेत.

# आगरी साईत्य शालेकडून शालेय साहित्य वाटप

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍
शहर प्रतिनिधी



**कल्याण** : आगरी बोली भाषा साहित्य प्रचार व प्रसार तसेच तिचे जतन व्हावे यासाठी आगरी साईत्य शाला ही ऑनलाइन व्हॉस्टअप समूहाच्या माध्यमातून सुरू करण्यात आली आहे. या समूहामार्फत वेगवेगळे उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करीत असतात. अशीच एक पोस्ट या समूहावर बदलापूर जोवेलीचे दुर्वास पाटील यांनी शाळेला मदत करण्याची विनंतीवजा पोस्ट टाकली. त्या गरजू शाळेला मदत करण्याचे आवाहन समूहाचे प्रशासक जयंत पाटील यांनी केले असता दोन ते तीनच दिवसात तीस हजार रुपये जमा झाले.

अशाप्रकारे जमा झालेल्या निधीतून शाळेसाठी फ्रीज, लेझीम, सिनर ड्रम, बास ड्रम, ताशा, झांज, कॅरम बोर्ड, चोस मॅट,फुटबॉल, लगोरी, दोरी रस्सी, लोखंडी गोळा, वेट मशीन, हाईट चार्ट अश्या प्रकारचे साहित्य या संपूर्ण निधीतून हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील विद्यालय खरवई-मानकिवली-जोवेली येथे शाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांना देण्यात आले. हे वाटप करतांना समूह प्रशासक जयंत पाटील, साहित्यिक संदेश भोईर, डॉ. शोभा पाटील, सुनील पाटील, नितुराज पाटील, राजेंद्र पाटील, नरेश खारीक, जय म्हात्रे, युवराज पाटील, योगेश महाजन, रवी शेलार, सृष्टी राजीव धुळे, श्रीपाद धुळे उपस्थित होते. साहित्य वाटपाच्या दरम्यान शाळेतील विद्यार्थ्यांनी आगरी साईत्य शालेच्या सदस्यांचे पुष्प वर्षाव करून स्वागत करण्यात आले. शाळेचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका रेश्मा खाडे व सुत्रसंचालन सहशिक्षिका प्रेरणा गायकवाड यांनी केले.

# रस्त्याच्या खोदकामांमुळे डोंबिवलीत वाहन कोंडी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**डोंबिवली** - ऐन सणासुदीच्या काळात डोंबिवली पूर्व, पश्चिमतेतील बहुतांशी मुख्य वर्दळीचे रस्ते सिमेंट काँक्रीट कामांसाठी खोदून ठेवण्यात आले आहेत. हे रस्ते खोदताना कोणताही पूर्वसूचना किंवा फलक मुख्य रस्त्याच्या प्रवेशाच्या ठिकाणी लावला जात नाही. त्यामुळे या खोदकामांमुळे रस्तोरस्ती वाहन कोंडी असे चित्र डोंबिवलीत आहे.

सिमेंट काँक्रीट रस्ते कामांसाठी आलेला निधी मार्च अखेरपर्यंत खर्च करायचा आहे. ही कामे वेळेत पूर्ण केले नाहीतर पुढील निधी मिळणे अशक्य होणार आहे. तसेच आगामी विधानसभा निवडणुका तोंडावर आहेत. त्यानंतरची राजकीय परिस्थिती काय असेल हे कोणालाही माहिती नाही. त्यामुळे शिंदे सरकारच्या काळात डोंबिवलीतील सिमेंट काँक्रीट रस्ते कामांसाठी मिळालेला निधी या सरकारच्या कालावधी खर्च करण्यासाठी अधिकाऱ्यांची धावपळ सुरू आहे.

डोंबिवलीचे आमदार तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी डोंबिवलीसाठी शासनाकडून मंजूर करून आणलेली ३७६ कोटी, अलीकडे आणलेली ५५ कोटीची रस्ते कामे आता शहरात सुरू आहेत. खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ३५० कोटीहून अधिक रकमेची रस्ते कामे शहरात मंजूर करून आणली आहेत. अशी दोन्ही प्रकारची कामे एकाचवेळी डोंबिवलीत सुरू आहेत. ही कामे एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम यांच्या ठेकेदारांकडून सुरू आहेत.

ही रस्ते कामे आहे त्या परिस्थितीत पूर्ण करण्याचा सपाटा ठेकेदारांनी लावला आहे. या जलदगती कामांमुळे जागोजागी रस्ते खोदकाम करण्यात आल्याने डोंबिवलीकरांना फेरफटका घेऊन इच्छित स्थळी जावे लागते. रस्ते कामे सुरू असलेल्या सोसायटीतील रहिवाशांना आपली वाहने सोसायटी बाहेर काढणे अवघड झाले आहे.

डोंबिवली पूर्वेतील सावरकर रस्ता, शिवमंदिर स्मशानभूमी रस्ता, चार रस्त्याचे डॉ. राजेंद्र प्रसाद रस्त्याकडे जाणारा भाग काँक्रीट रस्त्यांसाठी खोदण्यात आला आहे. पश्चिमेतील श्रीधर म्हात्रे चौक ते गरीबाचापाडा अनमोलनगरी रस्ता, नवापाड्यातील भोईर जीमखाना भागातील रस्ता खोदून ठेवण्यात आला आहे. वाहन चालकांना पर्यायी रस्ते शोधत जावे लागते. या रस्त्यावर ट्रक, अवजड वाहन आले की वाहन कोंडी होते.

दिवाळसणापूर्वी हे रस्ते सुस्थितीत करून घेण्याची मागणी डोंबिवलीकरांनी प्रशासनाकडे केली आहे. डोंबिवलीत एकूण सुमारे ६८ हून अधिक रस्ते कामे प्रस्तावित आहेत. श्रीधर म्हात्रे चौक ते अनमोल नगरी रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यास पालिकेकडून टाळाटाळ केली जात असल्याने या रस्त्याच्या ठेकेदाराने काम बंद ठेवले आहे. पालिका आणि ठेकेदाराच्या वादात प्रवाशांना या भागातील अरूंद रस्त्यावरून जावे लागते. रिक्षा चालक मालक संघटनेने हे काम रुंदीकरण करून लवकर सुरू करण्याची मागणी आयुक्तांकडे केली आहे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. ह प्रभागाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांनी या रस्ते मार्गातील अतिक्रमणधारकांना स्वताहून अतिक्रमणे काढण्याचे कळविले आहे, असे सांगितले.

## शिधापत्रिका धारकांनी ईकेवायसी करण्याचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : कल्याण परिसरातील शिधापत्रिका धारकांनी ३१ ऑक्टोबर पर्यंत कुटुंबातील सर्व सदस्यांनी राशन दुकानात जावुन आपले ईकेवायसी करून घ्यावे अन्यथा भविष्यात आपले धान्य बंद होईल असे आवाहन ३८ फ कल्याण प्रभारी शिधावाटप अधिकारी धरमसिंग बहुरे यांनी केले आहे. त्याच बरोबर पात्र शिधापत्रिका धारकांनी आपला आनंदाचा शिधा घेतला नसेल तर तो देखील आपल्या शिधावाटप दुकानातुन तात्काळ घेवून जावा. जे कुटुबातील व्यक्ती मयत झाले आहेत, त्यांचे नाव शिधापत्रिकेमधून ऑनलाइन ऑफलाईन कमी करून घ्यावे. कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार कार्ड घेऊन शिधावाटप कार्यालयातील आपल्या संबंधित शिधावाटप निरीक्षकांशी संपर्क करावा तसेच शिधापत्रिकेवरती नाव कमी करणे वाढवणे नवीन शिधापत्रिका मिळवण्यासाठी कुठल्याही दलालाशी संपर्क करू नये. शिधापत्रिका संबंधित सर्व कामे ही कार्यालयीन खिडकी वरती निशुल्क करून देण्यात येतात. त्यासाठी कुठल्याही दलालांना पैसे देऊन काम करून घेऊ नये असे आवाहन बहुरे यांनी केले आहे. तर शासनाने ईकेवायसीच्या नावाखाली पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्यापासून वंचित करू नये. कल्याण शिधावाटप कार्यालयाचा इष्टांक कोठा जानेवारीपासून अद्याप आलेला नाही अशी प्रतिक्रिया ३८ फ कल्याण शिधावाटप कार्यालय माजी विरोधी पक्ष सदस्य राम बनसोडे यांनी दिली.

## डोंबिवली रासरंग नवरात्री उत्सवात देवीची महाआरती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी



**कल्याण** : डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन प्रस्तुत आणि श्री नवदुर्गा युवा मंडळ, डोंबिवली आयोजित ''डोंबिवली रासरंग दांडिया उत्सवाचा तिसरा दिवस खास ठरला. शनिवारी उत्सवाला कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी उपस्थित राहून हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या गरबा रसिकांना उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. तर देवीची आरती अत्यंत खास ठरली. यावेळी देवीची सर्वांनी महाआरती - गंगाआरती केली. सर्वांना सुख समाधान प्राप्त कर असे मागणे यावेळी खासदार डॉ.शिंदे यांनी मागितले. या देवीच्या आरतीला आणि उत्सवाला राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तर शनिवारी सर्व गरबा रसिकांना रात्री १२ वाजेपर्यंत दांडिया खेळून उत्सव साजरा करता येणार असल्याची आनंदवार्ता खासदार डॉ.शिंदे यांनी दिली. यावेळी सर्वांनी एकच जल्लोष साजरा केला.

## दुर्गा नगर मित्र मंडळ दिवा यांच्यावतीने भव्य रक्तदान शिबीर



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
☐ **प्रतिनिधी**

**ठाणे -** दिवा शहर दातीवली तलाव येथे दुर्गा नगर मित्र मंडळाच्या वतीने नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी रक्तदान शिबिरामध्ये शेकडो रक्तदात्यानी रक्तदान केले. मंडळाचे हे १२ वें वर्ष असून मंडळांने सामाजिक बांधिलकी जोपासत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.ब्लड बँक प्लाजमा ब्लड सेंटर डोंबिवली यांनी रक्त संकलन केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मंडळाचे अध्यक्ष व संस्थापक मनोज खंडांगले यांनी स्वातः रक्त दान करूनच उपस्थितीमध्ये संपन्न झाले.

या शिबिराच्या निमित्ताने उपस्थित असलेले अनेक मान्यवर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.तसेच मंडळाच्या वतीने भव्य दिव्य रास गरबा सायंकाळीं अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने खेळला जातो सांस्कृतिक ,सामाजिक व शैक्षणिक उपक्रम ही दुर्गा नगर मित्र मंडळाच्या राबविले जात आहेत यावेळी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते अथक परिश्रम घेत उपक्रम यशस्वी करतात असे मनोज खंडागळे यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

## दीपेश म्हात्रे यांचा शिवसेना (उबाठा)पक्षात प्रवेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली -** शिवसेना शिंदे गटाचे प्रदेश युवासेना सचिव आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे खास समर्थक दीपेश पुंडलिक म्हात्रे यांनी रविवारी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह मुंबईत मातोश्री येथे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. अनेक नगरसेवक आपल्या सोबत असल्याचा त्यांचा दावा मात्र फोल ठरला. दीपेश, त्यांचा भाऊ जयेश यांच्या व्यतिरिक्त दोन माजी नगरसेविका त्यांच्या सोबत होत्या.

शिंदे शिवसेनेतील एकही तगडा नगरसेवक, पदाधिकारी दीपेश म्हात्रे यांच्या सोबत गेला नाही. कल्याण पूर्वेतील विधानसभेसाठी निवडणूक लढविणारे काही होतकरू यावेळी ठाकरे पक्षात प्रवेशाची शक्यता होती. त्यांनीही माघार घेतल्याचे चित्र होते. गेल्या महिन्यापासून दीपेश यांनी डोंबिवलीतील १२ हून अधिक नगरसेवक घेऊन ठाकरे पक्षात प्रवेशाची व्यूहरचना आखली होती. भाजप, शिवसेनेसह अनेक



पदाधिकाऱ्यांच्या गाठीभेटी त्यांनी घेतल्या होत्या. या सर्वांनी दीपेश यांना समर्थन देण्यास नकार दिल्याचे चित्र रविवारी होते.

डोंबिवलीतील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील कल्याण लोकसभा जिल्हाप्रमुख सदानंद थरवळ, ज्येष्ठ नगरसेवक तात्यासाहेब माने, महिला नेत्या वैशाली दरेकर यांसह कोणीही पदाधिकारी दीपेश यांच्यासोबत उपस्थित नव्हता. ठाकरे गटातील निष्ठावान शिवसैनिकांनी यापूर्वीच दीपेश यांच्या पक्षप्रवेशाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी आपल्या पक्षातील एकही नगरसेवक दीपेश सोबत जाऊ नये म्हणून रात्रीपासून संबंधितांवर पाळत ठेवली होती, असे समजते. रविवारी सकाळी १०० हून अधिका वाहनांचा ताफा घेऊन शेकडो कार्यकर्त्यांसह दीपेश म्हात्रे मातोश्री येथे पोहोचले होते.

तुम्हाला शिवसेनेत काही अनुभव आले म्हणून तुम्ही आता आमच्या सोबत आला आहात. हीच कृती जर तुम्ही अगोदर केली असती तर आपण कल्याण लोकसभा निवडणुकीच्यावेळीच आपली ताकद दाखवून दिली असती. शिवसेनेजवळ सत्ता, पैसा, गुंडाशाही असूनही आपल्या एका भगिनीला चार लाख मते या मतदारसंघात मिळाली. त्यामुळे आपण यापूर्वीच सोबत असता तर मुख्यमंत्री पुत्राला या मतदारसंघात आपण धूळ चारली असती, असे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सांगितले. साम, दाम, दंड, भेद वापरून डोंबिवली, कल्याण परिसरात आपण पक्ष वाढविण्यासाठी ताकदीने प्रयत्न करू. सत्ताधारी पक्षातील असूनही आमच्यावर सत्तेचा वापर करून गुन्हे दाखल करण्यात आले. अनेक नगरसेवक ठाकरे पक्षात येण्यास इच्छुक आहेत. त्यासाठी आपण प्रयत्न करू, असे दीपेश म्हात्रे म्हणाले.

युवासेना कल्याण लोकसभा जिल्हाध्यक्षपदी जितेन पाटील यांची युवासेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी तातडीने नियुक्ती केली. हे पद यापूर्वी दीपेश यांच्याकडे होते. दीपेश म्हात्रे वजनदार नेते होते, पण त्यांच्या जाण्याने शिवसेनेवर कोणताही फरक पडणार नाही, असे आमदार विश्वनाथ भोईर यांनी सांगितले.

## जीवनदीप महाविद्यालयाची भारतीय चित्रपट संग्रहालयाला अभ्यास भेट




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
☐ **प्रतिनिधी**

**मुंबई :** जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली येथील मास मीडिया विभागातर्फे अभ्यास भेट आयोजिली होती आणि यासाठी विशेषतः मुंबईतील नॅशनल म्युझियम ऑफ इंडियन सिनेमा या ठिकाणाची निवड करण्यात आली होती. यामध्ये विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. हे म्युझियम भारतीय भारतीय चित्रपटाच्या दुनियेत घेऊन जाते. भारतीय चित्रपटाच्या सुरुवातीपासून चा संपूर्ण प्रवास आणि त्यात होत गेलेली क्रांती यामध्ये विशेष रूपाने दर्शवली आहे. चित्रपटांमध्ये होत गेलेला बदल आणि झालेली ही डिजिटल क्रांती या म्युझियम मध्ये खूप चांगल्या पद्धतीने दर्शवली आहे. हे म्युझियम एक असा अनुभव प्रदान करते ज्यातून रेडिओ जुन्या टीव्ही त्या काळातील कॅमेरे , संगीत आणि त्यात होत गेलेला बदल म्हणजेच आताचे थ्रीडी चित्रपट ,टीव्ही, म्युझिक आणि बदलते कॅमेरे या साऱ्याच चित्र डोळ्यासमोर उभ करते. यातून विद्यार्थ्यांना चित्रपट सृष्टीचा अनोखा प्रवास पाहायला मिळाला. यावेळी सुप्रसिद्ध अभिनेते मनोज जोशी यांची भेट घेऊन चर्चा करण्यात आली यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री रवींद्र घोडविंदे प्राचार्य डॉ.के.बी कोरे, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर मास मीडिया विभागाचे प्रा. डॉ.राहुल तौर प्रा. मोहन घारे आणि प्रा.कविता काटकर यांच्या मार्गदर्शन आणि सहकार्याने ही अभ्यास भेट यशस्वीरित्या पार पडली.

# शेवटच्या कसारा आणि कर्जत लोकलच्या वेळेत बदल

## नवीन वेळापत्रकावर प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
☐ **प्रतिनिधी**

मुंबई : मध्य रेल्वेने नवीन वेळापत्रकात रात्री सुटणाऱ्या शेवटच्या कसारा आणि कर्जत लोकलच्या वेळेत बदल केला असून नवीन वेळापत्रकात कसारा, कर्जत लोकल ६ ते १२ मिनिटे आधी सोडण्यात येणार आहे. त्यामुळे शेवटची लोकल पकडण्यासाठी प्रवाशांना धावपळ करावी लागणार आहे. परिणामी, प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

मध्य रेल्वेवरील लांबपल्ल्याच्या गाड्यांच्या सुधारित वेळेनुसार, लोकल सेवांच्या वेळा बदलण्यात आल्या आहेत. सीएसएमटी - कसारा लोकल दररोज रात्री १२.१४ वाजता सुटते. तर, सीएसएमटी - कर्जत लोकल दररोज रात्री १२.२४ वाजता सुटते. मात्र, ५ ऑक्टोबरपासून सीएसएमटी - कसारा लोकल रात्री १२.०८ वाजता, तर सीएसएमटी - कर्जत लोकल रात्री १२.१२ वाजता सोडण्यात येणार आहे. या लोकल अनुक्रमे ६ आणि १२ मिनिटे आधी सोडण्यात येणार आहेत. त्यामुळे रात्री उशीरा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना कसारा, कर्जत लोकल पकडण्यासाठी धावपळ करावी लागणार आहे.

प्रवासादरम्यान लोकलमधून पडून प्रवाशांचा मृत्यू होतो. त्यामुळे वाढलेल्या गर्दीवर उपाययोजना करताना अधिक लोकल फेऱ्यांची मागणी करण्यात आली होती. तसेच सकाळ आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी कसारा - ठाणे आणि कर्जत - ठाणे अशा लोकल फेऱ्या सुरू करणे आवश्यक होते. मात्र, मध्य रेल्वे प्रशासनाने सीएसएमटी - ठाण्यापर्यंत धावणाऱ्या लोकल कल्याणपर्यंत विस्तारीत केल्या. त्यामुळे ठाण्यातील प्रवाशांची गैरसोय होणार आहे. तसेच सकाळी जलद लोकलमध्ये डोंबिवली येथील प्रवाशांना लोकलमध्ये चढता येत नाही. तर, मुंब्रा, कळवा येथे जलद लोकलला थांबा देऊन काय साध्य होणार आहे. यामुळे अपघातांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने प्रवासी महासंघ / प्रवासी संघटना यांना विश्वासात न घेता वेळापत्रकामध्ये केलेले बदल प्रवाशांना त्रासदायक ठरणार आहेत, असे उपनगरीय रेल्वे प्रवासी महासंघ अध्यक्ष लता अरगडे यांनी सांगितले.

रात्री शेवटच्या कसारा, कर्जत लोकलची सोडण्याची वेळ वाढवण्याऐवजी कमी केली आहे. नियमित वेळापत्रकाच्या ६ ते १२ मिनिटे आधी लोकल सुटेल. यामुळे कष्टकरी वर्गामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. कॅटरिंग, हॉटेल, सुरक्षा रक्षक, टॅक्सीचालक, रात्रपाळी करणाऱ्या हजारो कामगारांसाठी शेवटच्या दोन्ही लोकल महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे मध्य रेल्वेने शेवटच्या कसारा, कर्जत लोकलच्या वेळा पूर्वीप्रमाणेच कराव्यात.

**- राजेश घनघाव,**
**अध्यक्ष, कल्याण - कसारा - कर्जत प्रवासी महासंघ**



## २० दिवस बेशुद्ध असलेल्या चिमुकल्याला जीवदान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
☐ **प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** घणसोली येथे राहणाऱ्या चिन्मय जाधव या नऊ महिन्यांच्या चिमुकल्याला चिपळूणमध्ये विषारी मण्यार चावले. त्यामुळे तो सुमारे २० दिवस बेशुद्धावस्थेत होता. मात्र येथील वालावलकर रुग्णालयातील डॉक्टरांनी प्रयत्नांची शर्थ करून त्याचे प्राण वाचवले.

चिन्मयच्या पालकांनी गणपती उत्सवासाठी त्याला चिपळूण तालुक्यातील दुर्गवाडी येथे आणले होते. मात्र, ७ सप्टेंबरला चिन्मयच्या गळ्याला मण्यार या अत्यंत विषारी सापाने चावा घेतला. त्यामुळे ते बाळ पूर्णपणे बेशुद्ध झाले. श्वासही थांबला, आणि त्याच्या हातपायामधील ताकद पूर्णपणे गेली. बाळाला तातडीने भ. क. ल. वालावलकर रुग्णालयात आणण्यात आले. अशा बेशुद्ध अवस्थेत वालावलकर रुग्णालयातील बालरोगतज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ताबडतोब उपचार सुरु केले. कृत्रिम श्वास देण्याकरता व्हेंटिलेटर लावण्यात आला.

पनवेलहून खास मार्गदर्शन करणारे डॉ. महेश मोहिते आणि वालावलकर रुग्णालयाचे डॉ.अनिल कुरणे, डॉ. शिवाजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू केले. अनेक दिवस बाळ निपचित होते. शरीराची कोणतीही हालचाल होत नव्हती. जिवंतपणाचे लक्षण म्हणजे डोळ्याच्या बाहुल्याची हालचाल ती सुद्धा होत नव्हती. असे अनेक दिवसांपासून मुलाची प्रकृती गंभीर होत होती. भारत सीरमच्या अँटी स्नेक व्हेनमच्या एकूण ३० कुप्या देण्यात आल्या होत्या. तरीही सुधारणा दिसेना. शेवटी डॉक्टरांनी सुद्धा आशा सोडली. पण 'देव तारी त्याला कोण मारी' म्हणून दहाव्या दिवशी बाळाने डोळे उघडले. हळूहळू उपचारांना प्रतिसाद देत हात हलवू लागले आणि आपल्या आईला सुद्धा ओळखू लागले. जवळजवळ पाऊण महिना हे बाळ मृत्यू शय्येवर होते. पण बाळाला व्हेंटिलेटर असताना इन्फेक्शन होऊ नये, पाठीला जखमा होऊ नयेत याची पूर्ण जबाबदारी बालरोग तज्ज्ञांनी समर्थपणे पेलली?. बाळाचा संपूर्ण खर्च हा महात्मा जोतिबा फुले योजनेंतर्गत पूर्णतः मोफत करण्यात आला. त्यांच्या आई-वडिलांनी रुग्णालयाचे शतशः आभार मानले आहेत.

रुग्णालयातील बालरोग विभागातील नर्सिंग स्टाफ आणि बालरोग तज्ज्ञ डॉ. गौरी परब, डॉ. प्रचेता गुप्ता, डॉ. मोहित कडू, डॉ. सलोनी शाह, डॉ. पंक्ती मेहता, डॉ. तनीषा सोमकुवर यांनी विशेष सेवा देऊन बाळाचा जीव जीव वाचवला. याबद्दल रुग्णालय प्रशासनाचे पंचक्रोशीतून कौतुक होत आहे.

## कल्याण पूर्वेतील आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.ठाणे जीवनदीप वार्त**
☐ **प्रतिनिधी**

**कल्याण :** उपमुख्यमंत्री, गृहमंत्री व विधी न्याय मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यभरात गृह, विधी व न्याय मंत्रालय, धर्मदाय आयुक्तालय, महाराष्ट्र शासन द्वारा तथा स्थानिक संस्था वे ट्रयु लाईफ सामाजिक संस्था, बेटी बाचाओ बेटी पढाओ अभियान, सिव्हिल राईट्स ऑर्गनायझेशन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी कल्याण पूर्वेतील गणेश विद्यामंदिर याठिकाणी 'मोफत सामुदायिक आरोग्य शिबीर' आयोजित करण्यात आले होते. मोफत सामायिक आरोग्य शिबिरात ३०० ते ३५० विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिकांनी लाभ घेतला.

आरोग्य शिबिरात तज्ञ



डॉक्टर्सद्वारे मोफत आरोग्य तपासणी, सर्व प्रकारचे ब्लड चेकअप, ईसीजी चेकअप, तपासणी अंती आवश्यक असल्यास ऑपरेशनसाठी रेफर शासनाच्या माध्यमातून मोफत ऑपरेशन सुविधा देण्यात येत आहेत. आता पर्यंत शेकडो रुग्ण नागरीकांनी शिबिराचा लाभ घेतला आहेत. आरोग्य शिबीरे राज्यभरात व ठाणे जिल्ह्यात ठिक ठिकाणी राबविण्यात येत आहेत. या शिबिरात मोठ्याप्रमाणात असंख्य नागरिक लाभ घेत आहेत. यापुढेही आयोजित सार्वजनिक आरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त लाभ नागरिकांनी घ्यावा अशी माहिती सार्वजनिक आरोग्य शिबीराचे समन्वयक विधीतज्ञ तथा शिबीराचे आयोजक संस्था अध्यक्ष अ‍ॅड डॉ राजु राम यांनी यावेळी दिली.

यावेळी प्रमुख उपस्थिती संस्था विश्वस्त, आरोग्य शिबीर व्यवस्थापक ?ड शिल्पा राजु राम, महालॅबचे टेक्निशन सिमरन सपकाळे, साक्षी बेनके, कार्यकर्ते सुनिल शेलार, रुबन गायकवाड, नितीन शिंदे, ग्लोरी राम, सेंच्युरी रेयॉन हॉस्पिटलचे डॉ. हर्षल झांबरे, नर्स प्रिती चिंदरकर, लक्ष्मी जाधव, तसेच गणेश विद्यामंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका ललिता मोरे, शाळेचे विश्वस्त मंडळ, शिक्षक वर्ग आदींनी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून आणि सहकार्य केले.

## पोलिसांची गांधीगिरी

### हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीस्वारांना हेल्मेटचे वाटप




**दै.ठाणे जीवनदीप वार्त**
☐ **प्रतिनिधी**

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीमधील रस्त्यांवर हेल्मेट न घालणाऱ्या दुचाकीस्वारांची संख्या मोठी आहे. वेळोवेळी नियम न पाळणाऱ्या वाहनचालकांमध्ये वाहतूक शिस्त येण्यासाठी दंड वसुलीच्या कार्यवाहीवर न थांबता तळोजातील वाहतूक विभागाच्या पोलिसांनी दुचाकीस्वारांच्या सुरक्षेसाठी हेल्मेट उपलब्ध करुन दिले आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये ३० वर्षांनंतर पहिल्यांदा वाहनतळाचा प्रश्न सुटला. त्यामुळे रस्त्याकडेला उभे राहऱ्या अवजड वाहनांचा प्रश्न काही प्रमाणात सुटला आहे. मात्र दुचाकीस्वार विना हेल्मेट तळोजातून अनेकदा येजा करताना दिसतात. वेळोवेळी अशा दुचाकीस्वारांवर दंडाची कारवाई करुनही हे प्रमाण कमी होत नाही. त्यामुळे तळोजा वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील कदम यांनी गरजू दुचाकीस्वारांना हेल्मेट उपलब्ध करुन देण्यासाठी वॉलरेक कंपनीच्या व्यवस्थापनासमोर हेल्मेट देण्याचा प्रस्ताव मांडला. वॉलरेक कंपनीनेसुद्धा पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शंभर हेल्मेट उपलब्ध करुन दिल्यावर गुरुवारी तळोजातील रस्त्यांवरील गरजू आणि विना हेल्मेट असलेल्या दुचाकीस्वारांना हे हेल्मेटचे वाटप करण्यात आले. यामुळे तळोजातील अपघातांचे प्रमाण कमी होईल अशी अपेक्षा वरिष्ठ पोलीस निरीक्षक कदम यांनी व्यक्त केली.





**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट आणि पोटगी, नावात बदल बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

कार्यालय - 9619188558 ■ +91 9158078601
ईमेल- jeevandeepvartanews2020@gmail.com


## टिटवाळा स्थानकातील सरकते जिने व लिफ्ट बंद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
☐ **प्रतिनिधी**

डोंबिवली, ता. ६ : टिटवाळा रेल्वे स्थानकावरील सरकते जिने व लिफ्ट बंद आहेत. त्यामुळे एका दिव्यांग व्यक्तीला चार ते पाच प्रवाशांनी सायकलीसह उचलून रेल्वे प्लॅटफॉर्मवर नेले. या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर चांगलाच व्हायरल होत आहे. शनिवारी (ता. ५) सायंकाळची ही घटना असल्याचे म्हटले जात आहे. टिटवाळा स्थानक परिसरात दिव्यांगांसाठी योग्य सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहेत. रेल्वे स्थानकात ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, तसेच जास्त सामान असणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे स्थानकात सरकते जिने, लिफ्टची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे; मात्र अनेकदा या सुविधा बंद असल्याने प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मध्य रेल्वे मार्गावरील टिटवाळा रेल्वे स्थानकात अशीच एक घटना घडली आहे. स्थानकातील सरकते जिने व लिफ्ट बंद असल्याने एका दिव्यांग व्यक्तीला चार ते पाच प्रवाशांनी सायकलीसह उचलून प्लॅटफॉर्मवर नेले. ही घटना एका प्रवाशाने आपल्या मोबाईलमध्ये कैद केली आणि तो व्हिडिओ समाजमाध्यमांवर पोस्ट केला. व्हिडिओ व्हायरल होताच लोकांनी स्थानकावरच्या सुविधांच्या अभावाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. दिव्यांगांसाठी आवश्यक सोयीसुविधा असणे किती महत्त्वाचे आहे, हे या घटनेतून अधोरेखित होते. स्थानकावर असलेले सरकते जिने व लिफ्ट बंद असल्यामुळे दिव्यांग व्यक्तीला मोठा त्रास सहन करावा लागला. यामुळे प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण आहे. त्यांनी रेल्वे प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. दिव्यांग व्यक्तीनेही याबाबत आपला संताप व्यक्त केला आहे. प्रशासनाने लवकरात लवकर दिव्यांगांसाठी योग्य सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली आहे.


'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अ‍ॅड. जयकुमार ए. रिजवानी